## <u>२रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, माढा यांच्या न्यायालयात</u>

(पिठासीन अधिकारी श्रीमती व्ही. सी. क्षीरसागर)

| CNR No.MHSO170014542022 | दाखल दिनांक | ०६/०५/२०२२ | | |
|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | ०६/०५/२०२२ | | |
| | निकाल दिनांक | २८/०४/२०२६ | | |
| | कालावधी | ०३ व. | ११ म. | २२ दि. |

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.५६५/२०२२</u>** **<u>नि.क्र.३३</u>**

संदेश सुदाम पवार
वय– २८ वर्षे, धंदा – शेती
रा. चौभेपिंपरी, ता. माढा, जि. सोलापूर ... **<u>वादी</u>**

**विरुध्द**

१. सुदाम शंकर पवार
वय – ४८ वर्षे, धंदा – शेती

२. संतोष शंकर पवार
वय – ४५ वर्षे, धंदा – शेती

३. अरुण शंकर पवार
वय – ४३ वर्षे, धंदा – शेती

४. सुभाष भगवान लोभे
वय – ४३ वर्षे, धंदा – शेती

५. रणजित अरुण पवार
वय – २९ वर्षे, धंदा – शेती

६. सौरभ संतोष पवार
वय – २१ वर्षे, धंदा – शेती

७. गौरव संतोष पवार
वय – २३ वर्षे, धंदा – शेती

८. दादा धोंडीबा पवार
वय – ४५ वर्षे, धंदा – शेती

९. मनोहर धोंडीबा पवार
वय – ५१ वर्षे, धंदा – शेती

१०. रुक्मीणी सुखदेव पवार
वय – ४१ वर्षे, धंदा – शेती

११. वामन धोंडीबा पवार
वय – ६८ वर्षे, धंदा – शेती

१२. महादेव धोंडीबा पवार
वय – ७३ वर्षे, धंदा – शेती

१३. सुरेश पंडीत जाधव
वय – ५५ वर्षे, धंदा – शेती

१४. शहाजी पंडीत जाधव
वय – ५३ वर्षे, धंदा – शेती

१५. संतोष मारुती जगताप
वय – ४८ वर्षे, धंदा – शेती

१६. अशोक मारुती जगताप
वय – ४३ वर्षे, धंदा – शेती

१७. अर्जुन किसन उरमोडे
वय – ५१ वर्षे, धंदा – शेती

१८. भिमराव किसन उरमोडे
वय – ५१ वर्षे, धंदा – शेती

१९. शहाजी सौदागर सावंत
वय – ५० वर्षे, धंदा – शेती

२०. हनुमंत लक्ष्मण शेंडगे

वय – ५३ वर्षे, धंदा – शेती

२१. बळीराम लक्ष्मण शेंडगे
वय – ५८ वर्षे, धंदा – शेती

२२. अभिमान लक्ष्मण शेंडगे
वय – ५१ वर्षे, धंदा – शेती

२३. सुरेश हनुमंत शेंडगे
वय – ५२ वर्षे, धंदा – शेती

२४. भैरवनाथ बळीराम शेंडगे
वय – ३१ वर्षे, धंदा – शेती

२५. अनिल मारुती गवळी
वय – ५१ वर्षे, धंदा – शेती

२६. ओंकार अनिल गवळी
वय – २६ वर्षे, धंदा – शेती

२७. वैशाली अनिल गवळी
वय – ४५ वर्षे, धंदा – शेती
रा. चौभेपिंपरी, ता. माढा, जि. सोलापूर ... **<u>प्रतिवादी</u>**

..........................................................................................................

**दावाः– <u>दावा मिळकतीची मोजणी होऊन हददीखुणा कायम होऊन मिळण्यासाठी</u>**

..........................................................................................................

वादींतर्फे विधीज्ञ श्री. डि. एम. देशमुख
प्रतिवादी क्र.१ ते २७ यांचेविरुध्द एकतर्फा

..........................................................................................................

## <u>न्या य नि र्ण य</u>

**(घोषित दिनांकः २८ एप्रिल, २०२६)**

वादी यांनी सदर दावा मिळकतीची मोजणी होऊन हददीखुणा कायम होऊन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन –**

२. मौजे चौभेपिंपरी, ता. माढा, जि. सोलापूर येथील

दावा मिळकत १(अ)

| गट नंबर | क्षेत्र | | | | चतुःसिमा |
|---|---|---|---|---|---|
| | हे. | आर. | रु. | पै. | पूर्वेस – गट क्र.१६० |
| १५९ | १२ | १४ | २० | ९० | पश्चिमेस – गट क्र.१५८, १६८, १६७ |
| पो.ख. | ० | ११ | | | दक्षिणेस – गट क्र.१६७, १६५ |
| एकूण | १२ | २५ | २० | ९० | उत्तरेस – मार्ग माढयाचा रस्ता |

दावा मिळकत १(ब)

| गट नंबर | क्षेत्र | | | | चतुःसिमा |
|---|---|---|---|---|---|
| | हे. | आर. | रु. | पै. | संपुर्ण गट असल्याने चतुःसिमा दिलेल्या नाहीत. |
| १५९/६/ड पैकी | ० | ४० | ० | ५० | |
| १५९/६/ड पैकी | ० | ४०.५० | ० | ५० | |
| १५९/६/ड पैकी | ० | ४०.५० | ० | ५० | |

दावा मिळकत १(क)

| गट नंबर | क्षेत्र | | | | चतुःसिमा |
|---|---|---|---|---|---|
| | हे. | आर. | रु. | पै. | संपुर्ण गट असल्याने चतुःसिमा दिलेल्या नाहीत. |
| १५९/६/अ पैकी | ० | ४० | १ | ८९ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५९/६/अ पैकी | १ | २२ | ५ | ७६ | |

दावा मिळकत १(ड)

| **गट नंबर** | **क्षेत्र** | | | | **चतुःसिमा** |
|---|---|---|---|---|---|
| | हे. | आर. | रु. | पै. | संपुर्ण गट असल्याने चतुःसिमा दिलेल्या नाहीत. |
| १५९/ब पैकी | १ | २२ | ० | ५४ | |
| १५९/ब पैकी | ० | ४० | ० | ५१ | |

दावा मिळकत १(इ)

| **गट नंबर** | **क्षेत्र** | | | | **चतुःसिमा** |
|---|---|---|---|---|---|
| | हे. | आर. | रु. | पै. | संपुर्ण गट असल्याने चतुःसिमा दिलेल्या नाहीत. |
| १५९/६/क | १ | ६२ | २ | ०५ | |

**<u>वादीचे थोडक्यात कथन की –</u>**

३. वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकती १ ब ते इ मधील मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.१ ते ७ यांची वडिलार्जीत मालकी वहीवाटीची मिळकत आहे. मौजे चौभेपिपंरी येथील जमीन गट क्र.१५९/६/ड हा वादी यांचे मालकीचा आहे. मुळ जमीन गट क्र.१५९ याचे ९ पोट हिस्से पडले. त्याप्रमाणे वादींना जमीन गट क्र.१५९/६/ड हा देण्यात आला. सदर मुळ जमीन गट क्र.१५९ असल्याने सदर जमीनीचे पोट हिस्से पडून ७/१२ पत्रकी ७/१२ उतारे वेगळे झाले. परंतु सदर मिळकतींचे चतुःसिमा ह्या अनिश्चीत अशा आहेत. सदर पोट हिस्से जरी

वेगळे झाले असले तरी भुमी अभिलेख, माढा यांचे कार्यालयात जमीन गट क्र. १५९ चा गट नकाशा हा एकसंध असा निघतो. सदर गटाची आजपावेतो फाळणी, गटविभाजन, झालेले नाही. तसेच सदर उपगटामध्ये वादी व प्रतिवादी क्र.१ ते १२ यांचे मालकी व कब्जे वहिवाट आहे. त्यामुळे सदर प्रतिवादी क्र.१३ ते २७ यांचे जमीन गट क्र. १५९ चे लगतचे गटधारक आहेत. सदर जमीन गट क्र.१५९ चे क्षेत्र उताऱ्यात नमुद क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र वहिवाटीस असल्याचे वादींना जाणवत आहे. त्यावेळी वादींनी प्रतिवादींना मुळ गट व उपगटाची मोजणी करण्याची विनंती केली व संमतीदर्शक सह्या मागितल्या. त्यावेळी प्रतिवादी यांनी त्यास स्पष्टपणे नकार दिला. त्यामुळे प्रतिवादी व वादी यांची गटाची चतुःसिमा ह्या निश्चीत नाहीत. सदर चतुःसिमा हे निश्चीत होणे गरजेचे व आवश्यक आहे.

४. वादीचे पुढे असे कथन आहे की, तसेच प्रतिवादी क्र.१३ ते २७ हे मुळ गट क्र.१५९ चे चतुःसिमेचे लगतचे शेतकरी असल्याने त्यांना सदर दावेकामी जरुरीचे पक्षकार म्हणुन सामिल केलेले आहे. सदर मुळ गट क्र.१५९ चे मोजणी होणे गरजेचे असुन सदर गटाच्या हद्दीखुणा ह्या निश्चीत नाहीत. सदर मुळ गटासंबंधी वादीने प्रतिवादींना मोजणी करणेकामी विचारणा केली असता प्रतिवादींनी मोजणी करणेकामी संमती दिली नाही. वादीने प्रतिवादी यांना दि.०७/०४/२०२२ रोजी मोजणी कार्यालयाकडे मुळ गटाची मोजणी करणेकामी अर्ज करणेबाबत विचारणा केली त्यावेळी सदर गटधारकांची मोजणी अर्जावर संमतीदर्शक सह्या घेणे आवश्यक असल्याने प्रतिवादींनी वादीस संमतीदर्शक सह्या देणेस स्पष्टपणे नाकारले. त्यामुळे सदर वादीस मोजणी कार्यालयामार्फत शासकीय मोजणी करता आली नाही. करिता, वादीने मोजणी होवुन हद्दीखुणा कायम होवुन मिळणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

५. प्रतिवादी क्र.१ ते ७ व १० ते २४ तसेच प्रतिवादी क्र.२५ ते २७ यांना दावा समन्सची बजावणी होऊन देखील ते हजर झाले नाहीत. त्यामुळे माझे पुर्वाधिकारी यांनी अनुक्रमे दि.०४/०५/२०२३ व दि.०६/०५/२०२३ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ७ व ११ ते २४ तसेच प्रतिवादी क्र.२५ ते २७ यांचेविरुध्द एकतर्फा चालविण्याचा आदेश निशाणी क्र.१ वर पारीत करण्यात आला. तसेच प्रतिवादी क्र.८ व ९ यांना दावा समन्सची बजावणी होऊन देखील ते हजर झाले नाहीत. त्यामुळे अनुक्रमे दि.१५/१२/२०२३ व दि.०२/१२/२०२३ रोजी प्रतिवादी क्र.८ व ९ यांचेविरुध्द एकतर्फा चालविण्याचा आदेश निशाणी क्र.१ वर पारीत करण्यात

आला.

६. वादींतर्फे विधीज्ञ श्री. डि. एम. देशमुख यांचा युक्तीवाद ऐकला व प्रतिवादींना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी युक्तीवाद केला नाही. अभिलेखावरुन खालील मुद्दे विचारार्थ उद्भवत असून त्यावरील निष्कर्ष कारणे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी हे सिध्द करतात का की, प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या एकत्र मोजणीकरिता संमती दिली नाही? | होय |
| २. | वादी हे सिध्द करतात का की, वादी हे मागणी केल्याप्रमाणे दावा मिळकतीचे मोजणी होऊन हद्दीखुणा कायम होऊन मिळण्यास तसेच स्वतंत्र नकाशा तयार होऊन मिळण्यास पात्र व हक्कदार आहेत? | होय |
| ३. | काय आदेश व हुकूमनामा? | अंतिम आदेशाप्रमाणे |

७. वादीने दाव्याच्या समर्थनार्थ वादी यांची साक्ष निशाणी क्र.२८ खाली नोंदविली आहे. तसेच त्यांच्या कथनाच्या समर्थनार्थ मौजे चौभेपिंपरी येथील गट क्र.१५९/६/ड, १५९/१, १५९/२, १५९/३, १५९/४, १५९/५, १५९/६/अ, १५९/६/क, १५९/६/ब च्या सातबारा उता–यांची प्रमाणित प्रती अनुक्रमे निशाणी क्र.३२ ते ४० वर दाखल केल्या आहेत. तसेच वादीने निशाणी क्र.२५ वरील मोजणी अहवालावर मान्य व कबुल केला आहे. वादींनी निशाणी क्र.२९ वर पुरसिस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला. याउलट, प्रतिवादींनी कोणताही लेखी अथवा तोंडी पुरावा दाखल केला नाही.

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्र.१ करीता</u>

८. वादींनी त्यांच्या कथनांचे समर्थनार्थ त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.२८ वर

दाखल करुन त्याचे पुराव्याचे शपथपत्रामध्ये दाव्यातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. वादींने येणेप्रमाणे तोंडी पुरावा दिला की, दावा मिळकत कलम १ (ब) ते १ (इ) या मिळकती वादी व प्रतिवादी क्र.१ ते ७ यांच्या वडीलार्जीत मालकीच्या होत्या. मुळ जमीन गट क्र.१५९ चे नऊ पोटहिस्से पडले असून त्याप्रमाणे गट क्र.१५९/६/ड हा वादीस देण्यात आला. वादीने त्याच्या कथनांच्या समर्थनार्थ अभिलेखावर दावा मिळकतींचे ७/१२ उतारे दाखल केले आहेत. निशाणी क्र.३२ वरील मौजे चौभेपिंपरी येथील गट क्र.१५९/६/ड चा ७/१२ उता–यावरती वादीच्या नावे ४० आर क्षेत्र व प्रतिवादी क्र.५ च्या नावे ४०.५० आर क्षेत्र व प्रतिवादी क्र.६ सौरभ व क्र.७ गौरव यांच्या नावे ४०.५० आर क्षेत्र असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादी दावा मिळकत कलम १ (ब)(i) चे मालक व कब्जे वहिवाटदार असल्याचे दिसून येते.

९. वादींचे पुढे येणेप्रमाणे पुरावा दिला की, सदर गट हा एकच गट असून सदर गटाचे वहिवाटनुसार पोटहिस्से पडले असून सदर गटाच्या पोटहिश्याप्रमाणे सिमा अनिश्चित आहेत. तसेच सदर गटाचे पोटहिश्यांचे भुमी अभिलेख कार्यालय, माढा येथे फाळणीबारा होऊन पोटहिश्यांचे नकाशे वेगळे झाले नाहीत. दावा मिळकतीच्या मुळ गटाच्या सिमा अनिश्चित असून पोट हिस्सा व पोटहिश्यातील पोटहिस्से यांच्या सिमा देखील अनिश्चित आहेत. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये सदर क्षेत्राच्या कारणावरुन वाद उपस्थित होत आहेत. वादीने दि.०७/०४/२०२२ रोजी प्रतिवादींकडे एकत्र मोजणी करण्याकरिता विचारणा केली असता प्रतिवादींनी संमती दिली नाही. प्रतिवादींनी सदर प्रकरणामध्ये हजर होऊन वादीचा उलटतपास घेतला नसल्याने वादीचा वरील पुरावा विनाआव्हानीत व अखंडीत राहिला आहे. वादींनी त्यांचे कथनांच्या समर्थनार्थ मौजे चौभेपिंपरी येथील गट क्र.१५९ चा गट नकाशाची प्रत निशाणी क्र.१७ वर दाखल केली असल्याचे दिसून येते. सदर गट नकाशावरुन गट क्र.१५९ चा संपुर्ण गटाचा एकच नकाशा असून पोटहिश्यांचे वेगळे नकाशे नसल्याचे दिसून येते. तसेच अभिलेखावरील वादीचा तोंडी पुरावा व कागदोपत्री पुरावा एकमेकांशी सुसंगत असल्याने तसेच वादीचा पुरावा विनाआव्हानीत व अखंडीत राहिल्याने विश्वासार्ह आहे. त्यामुळे वादी दावा मिळकतीचे मालक व वहिवाटदार असल्याचे तसेच प्रतिवादी यांनी मोजणीकरिता संमती दिली नसल्याचे वादींनी सिध्द केल्याचे दिसून येते. करिता, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.२ करीता</u>**

१०. सदर दाव्याचे स्वरुप दावा मिळकतीची मोजणी होऊन हददीखुणा कायम होऊन मिळणेकरिता आहे. सदर प्रकरणामधील वादीने अभिलेखावर निशाणी क्र.२२ वर दाखल केलेला न्यायालयीन आयुक्त यांच्या नेमणूकीचा अर्ज मंजूर करण्यात येऊन तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख, माढा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून दावा मिळकतीची मोजणीकरिता नेमणूक करण्यात आली होती. त्याप्रमाणे मोजणीदाराने दावा मिळकतीची मोजणी करुन मो.र.क्र.१०३३९ अहवाल निशाणी क्र.२५ वर दाखल केल्याचे दिसून येते. वादीने सदर मोजणी अहवाल व मोजणी नकाशा मान्य केल्याचे दिसून येते. प्रतिवादींनी सदर प्रकरणातील मोजणी अहवाल निशाणी क्र.२५ व मोजणी नकाशा निशाणी क्र.२५/१ वर हरकत नोंदविली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे वादींनी सदर नकाशा व अहवाल सिध्द केला आहे.

११. दाव्याचे अवलोकन करता वादी व प्रतिवादींमध्ये त्यांच्या क्षेत्रावरुन वाद नसल्याचे स्पष्ट होते. प्रतिवादींनी वादींचे दावा कलम १(ब)(i) मधील मिळकतीबाबत तसेच सदर मो.र.क्र.१०३३९ प्रमाणे मोजणी अहवाल निशाणी क्र.२५ व मोजणी नकाशा निशाणी क्र.२५/१ च्या अनुषंगाने कोणताही वाद उपस्थित केला नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर मोजणी नकाशाचे अनुषंगाने दावा कलम १(ब)(i) संदर्भात हद्दीखुणा कायम झाल्यास प्रतिवादींचे काहीही नुकसान होत नाही.

१२. **<u>E. Achuthan Nair Vs. P. Narayanan Nair and Anr. [Civil Appeal No.166(N) of 1974]</u>** या न्यायनिर्णयामध्ये हददीखुणा निश्चित करणेबाबतचा दिवाणी दावा दाखल करता येतो व तसा तो विचारात घेता येईल असे निरीक्षण नोंदविले आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यात वाद विषयाचे अनुषंगाने वादीने मोजणीबाबत केलेली मागणी निश्चितपणे वरील न्यायतत्त्यास अनुसरुन आहे. प्रतिवादींने वादींचे कथने नाकारली नाहीत तसेच त्याअनुषंगाने पुरावा देऊन ती गैरसिध्द केली नाहीत. त्यामुळे वादीचा पुरावा विनाआव्हानीत व अखंडीत राहिला आहे. त्यामुळे दावा मिळकतीची मोजणी नकाशाप्रमाणे हददीखुणा कायम केल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेला वाद कायम संपुष्टात येईल. त्यामुळे वादी दावा कलम १(ब)(i) मधील मिळकतींची मोजणी नकाशाप्रमाणे हददीखुणा कायम करुन स्वतंत्र नकाशा काढून

मिळण्यास वादी पात्र व हक्कदार आहे. करिता, मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते.

**मुद्दा क्र.३ करीता**

१३. वरील चर्चा केल्याप्रमाणे मुददा क्र.१ व २ यांच्या निष्कर्षाच्या अनुषंगाने सदर दावा खर्चासह अंशतः मंजूर होण्यास पात्र असल्याचे दिसून येते. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३५ अन्वये जिंकणाऱ्या पक्षकाराच्या हितात खर्चाबाबतचा आदेश पारित करणे गरजेचे आहे. त्यामुळे वादीच्या हितामध्ये खर्चासंबंधाने आदेश पारित करण्यात येते. त्यामुळे मुद्दा क्र.३ करिता खालील आदेश पारित करण्यात येते.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | दावा खर्चासह मंजूर करण्यात येतो. |
| २. | उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, माढा यांनी मौजे चौभेपिंपरी येथील गट क्र.१५९ व दावा मिळकत दावा कलम १(ब)(i), २ व ३ मधील मिळकतींचे (गट क्र.१५९/६/ड मधील ४० आर क्षेत्र, ४०.५० आर व ४०.५० क्षेत्र यांचे), प्रतिवादी क्र.१ ते ७ यांचे दावा कलम १ (क) ते (इ) मधील मिळकतींचे निशाणी क्र.२५ वरील मो.र.क्र.१०३३९ मोजणी नकाशाप्रमाणे हददीखुणा कायम करावे तसेच सदर मिळकतींचे नियमाप्रमाणे स्वतंत्र नकाशा तयार करावा, असे त्यांना आदेशीत करण्यात येते. |
| ३. | वादींनी त्याकरिता नियमानुसार योग्य ते शुल्क भरावे. |
| ४. | येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा. |

VAIBHAVI CHANDRAHAR KSHIRSAGAR
Digitally signed by VAIBHAVI CHANDRAHAR KSHIRSAGAR
Date: 2026.04.28 15:42:35 +0530

(व्ही. सी. क्षीरसागर)

दि.२८/०४/२०२६

२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, माढा

| **<u>CERTIFICATE</u>** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word for word as per original Order. | | |
| Name of Stenographer | : | N. B. Kamurti |
| Court Name | : | Smt. V.C. Kshirsagar<br>2nd Jt.CJJD & JMFC, Madha |
| Date of Order/Judgment | : | 28/04/2026 |
| Order/judgment signed by presiding officer on | : | 28/04/2026 |
| Order/judgment uploaded on | : | 28/04/2026 |